नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - २ रे<br>Year - 2nd | अंक - २९३<br>Issue - 293 | वार मंगळवार दि. ११ मार्च २०२५<br>Blow- Thuesday Date 11 March 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# महाराष्ट्र आता थांबणार नाही.., विकास आता लांबणार नाही...

## देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याच्या प्रधानमंत्री मोदी यांच्या संकल्पसिद्धीला बळ देणारा अर्थसंकल्प – उपमुख्यमंत्री अजित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'महाराष्ट्र आता थांबणार नाही.., विकास आता लांबणार नाही' असे सांगत शेती, शेतीपूरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्रा'चे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील. विधानसभा निवडणुकीत राज्यातील मतदारांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यात अर्थसंकल्प यशस्वी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचा अकरावा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना व्यक्त केला. तसेच विधापरिषदेमध्ये वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी हा अर्थसंकल्प सादर केला.

■ **अर्थसंकल्प सादर करताना उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री पवार यांचा निर्धार**

■ **शेती, शेतीपुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास क्षेत्रांसाठी भरीव तरतूद,**

■ **'विकसित भारत-विकसित महाराष्ट्रा'चे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा अर्थसंकल्प**

उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प विधानसभेत सादर केला. अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्यजननी जिजाऊ माँसाहेब, छत्रपती राजर्षि शाहू महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महामानवांचे स्मरण केले. शिखांचे नववे गुरु, श्री गुरु तेगबहादूर यांच्या हौतात्म्याचे हे ३५० वे वर्ष आहे. स्वराज्य सौदामिनी महाराणी ताराबाई यांचे हे त्रिशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीवर्ष आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जन्मवर्ष आहे. देशातील लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या आपल्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. याचाही कृतज्ञतापूर्वक उल्लेख त्यांनी केला.



राज्यात गुंतवणुकीला पोषक वातावरण असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या संकल्पपूर्तीला बळ देणारा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प आहे. औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर असून थेट विदेशी गुंतवणूकीच्या बाबतीतही देशात अव्वल आहे. जानेवारी, २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्याव्दारे येत्या काळात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे १६ लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे. वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात आलेल्या विविध कायद्यांनुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेली थकबाकीची तडजोड करण्याबाबतची अभय योजना उपमुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात जाहीर केली. अभय योजनेचे नाव महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यानी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२५ असे असून या अभय योजनेचा कालावधी प्रस्तावित कायदा लागू झाल्याच्या दिनांकापासून दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत असेल. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

ठळक वैशिष्ट्ये :

राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरले आहे. तसेच राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे. सन २०२५-२६ ची राजकोषीय तूट १ लाख ३६ हजार २३५ कोटी रुपये आहे.

**(पान २ वर....)**

# परीक्षांमधील गैरप्रकारांमुळे विश्वासाला तडे, आरोपींचा जामीन फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : सरकारी भरती परीक्षेत बनावट उमेदवारांना बसवल्याचा आरोप असलेल्या दोन व्यक्तींचा जामीन अर्ज सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळून लावला. 'अशा गुन्ह्यांमुळे नागरिकांचा सार्वजनिक प्रशासन आणि कार्यकारी मंडळावरील विश्वास डळमळीत होत आहे,' असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. राजस्थान उच्च न्यायालयाच्या जामीन आदेशाला आव्हान देण्याबाबत राज्य सरकारने दाखल केलेले अपील न्यायमूर्ती संजय करोल आणि अहसानुद्दीन अमानुल्ला यांच्या खंडपीठाने मंजूर करताना वरील मत व्यक्त केले.

खंडपीठाने म्हटले की, 'एकदा जामीन मंजूर झाला की तो सर्वसाधारणपणे रद्द होत नाही, या वस्तुस्थितीची आम्हाला जाणीव आहे आणि आम्ही या मताचे पूर्ण समर्थन करतो. तथापि, प्रतिवादी-आरोपींच्या कथित कृत्यांचा एकूण आघात आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम लक्षात घेऊन येथे अवलंबलेला दृष्टिकोन घेण्यात आला आहे.' प्रत्यक्षात सरकारी नोकऱ्यांचा शोध घेणाऱ्यांची संख्या भारतात उपलब्ध असलेल्या नोकऱ्यांपेक्षा अधिक प्रमाणात असल्याचेही न्यायालयाने अधोरेखित केले.

'एफआयआर'मध्ये आरोप आहे की, इंद्रराज सिंह नावाच्या व्यक्तीने 'साहाय्यक अभियंता नागरी (स्वायत्त प्रशासन विभाग) स्पर्धा परीक्षा २०२२'मध्ये बनावट उमेदवार बसवून परीक्षेच्या पावित्र्याशी तडजोड केली. तसेच हजेरी पत्रकात छेडछाड करण्याबरोबरच बनावट उमेदवाराचे छायाचित्र मूळ प्रवेशपत्रावर चिकटवण्यात आल्याचा आरोप त्याच्यावर होता. सर्वोच्च न्यायालयाने ७ मार्च रोजी आदेश देत आरोपींना दोन आठवड्यांत संबंधित न्यायालयात शरण येण्याचे निर्देश दिले होते.

प्रत्येक नोकरीसाठी विहित प्रवेश परीक्षा किंवा मुलाखत प्रक्रियेचे पालन करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेत संपूर्ण सावधानता बाळगली जाते, ज्यामुळे लोकांचा विश्वास आणखी वाढत आहे. या पदांसाठी जे खरोखर पात्र आहेत, त्यांनाच नियुक्त केले जात आहे. परंतु आरोपींच्या कथित कृत्यांमुळे सार्वजनिक प्रशासन आणि कार्यकारी मंडळावरील जनतेचा विश्वास कमी होऊ शकतो. आरोपींनी स्वत:च्या फायद्यासाठी परीक्षेच्या पावित्र्याशी तडजोड केली. ज्यांनी नोकरी मिळवण्याच्या आशेने परीक्षेला बसण्यासाठी मनापासून प्रयत्न केले, अशा उमेदवारांवर अशा कृत्याचा परिणाम होत असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

# रवींद्र धंगेकरांनी केला शिवसेनेत प्रवेश; आता कळेल हू इज धंगेकर : शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पुण्यातील कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि काँग्रेस नेते रवींद्र धंगेकर यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी आमदार धंगेकर यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला.

२०२३ मध्ये कसबा विधानसभेच्या पोटनिवडणुकीत रवींद्र धंगेकर यांनी भाजपाच्या बालेकिल्ल्यात सध्याचे आमदार हेमंत रासने यांचा पराभव केला होता. त्यानंतर त्यांची राज्यभरात चर्चा झाली होती. मात्र, गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत धंगेकर यांना पराभव स्वीकारावा लागला होता. त्यानंतर त्यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. आज धंगेकर यांच्या पक्षप्रवेशावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, आता लोकांना कळेल हू इज धंगेकर? अशी मिश्किल टिप्पणी केली. शिंदे यांच्या या टिप्पणीनंतर



उपस्थितांमध्ये हशा पिकला.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, रवींद्र धंगेकर हे पुण्यातील लोकप्रिय लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी त्यांची ओळख कामाने निर्माण केली आहे. यांच्या पोटनिवडणुकीवेळी मी तिकडे होतो. ती निवडणूक गाजली पण, सगळी फौज लागली तरी धंगेकरांनी बाजी मारली आणि लोकसेवक काय असतो हे दाखवले. आता तुम्ही शिवसेनेत आला आहात, त्यामुळे लोकांना कळेल हू इज धंगेकर?

दरम्यान आज सकाळी माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी पत्रकार परिषद घेऊन काँग्रेस सोडणार असल्याची माहिती दिली होती. ते म्हणाले, मी गेल्या १०-१२ वर्षांपासून या पक्षाबरोबर काम करत आहे. पक्षातील सहकारी हे कुटुंबातील सदस्य बनले आहेत. सर्वांनी माझ्यावर प्रचंड प्रेम केलं. मी लोकसभा निवडणूक लढवली, विधानसभा निवडणूक लढवली, त्यावेळी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी माझ्यामागे मोठी ताकद उभी केली. त्यांच्या जोरावरच मी त्या निवडणुका लढवू शकलो. मी निवडणुकीत पराभूत झालो ती वेगळी गोष्ट आहे. मात्र पक्षातील लोकांनी माझ्यासाठी कष्ट केले. सर्वांनी माझ्याबरोबर ताकद उभी केली होती. त्यामुळेच आता पक्ष सोडताना मला दुःख होत आहे.

# सामाजिक न्यायाला प्राधान्य देणारा अर्थसंकल्प : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महायुती सरकार चे अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी आज महाराष्ट्र राज्याचा सादर केलेला अर्थसंकल्प हा सामाजिक न्यायाला प्राधान्य देणारा अर्थसंकल्प आहे. महायुती सरकार च्या या पहिल्या सर्वसमावेशक आणि विकसित भारताचे स्वप्न पूर्णतेकडे महाराष्ट्राची वेगवान वाटचाल घडविणाऱ्या या अर्थसंकल्पाचे आपण रिपब्लिकन पक्षाच्या वतीने स्वागत करीत आहोत.अशी प्रतिक्रिया रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी व्यक्त केली आहे.

राज्याच्या सामाजिक न्याय विभागाला २,९२३ कोटी अनुसुचित जाती विशेष घटक विकास योजनेसाठी २२,५६८ कोटी भरीव तरतुद करणारा हा अर्थसंकल्प आहे. अनुसुचित जाती विशेष घटक विकास योजनेसाठी ४२ टक्के निधीची वाढ करण्यात आलेली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत सुमारे २ कोटी ५३ लाख लाभार्थी महिलांना ३३ हजार २३२ कोटी रुपये निधीचे वाटप, सन २०२५-२६ मध्ये या योजनेकरीता एकूण ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निर्णयाचे आपण स्वागत करतो. महाराष्ट्राच्या यंदाच्या अर्थसंकल्पात दलित, आदिवासी, ओबीसी, महिला आणि शेतकरी सर्व घटकांना न्याय देणारा सर्वसमावेशक अर्थसंकल्प आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदीच्या नेतृत्वात विकसीत भारत घडविण्याच्या उद्दिष्टाकडे महाराष्ट्राची वेगवान वाटचाल घडविणारा अर्थसंकल्प आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, या



सर्वांचे महाराष्ट्राचा उत्कृष्ट बजेट दिल्याबद्दल आपण त्यांचे स्वागत करीत आहोत. असे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी कळविले आहे.

## गुंतवणुकीला प्राधान्य देणारा अर्थसंकल्प : अजित पवार

## राज्याला पुढे नेणारा अर्थसंकल्प शिंदे

# पंचसूत्रीवर आधारित विकसित महाराष्ट्राचा संकल्प : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : शेती, उद्योग, पायाभूत सुविधांबरोबरच रोजगार आणि सामाजिक विकास अशी पंचसूत्रीवर आधारलेला राज्याचा यंदाचा अर्थसंकल्प विकसित भारताबरोबरच, विकसित महाराष्ट्राचा संकल्प साकार करणारा आणि लोकाभिमुख असा हा अर्थसंकल्प असून येत्या काळात संतुलित अशा या अर्थसंकल्पाला अनुसरून आमची पुढील वाटचाल असेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे दिली.

हा अर्थसंकल्प संतुलित स्वरूपाचा आणि समाजातील सर्व घटकांना न्याय देणारा आहे. गेल्या वषभरात विविध योजनांवर झालेल्या खर्चामुळे राजकोषीय तूट वाढून राज्याची आर्थिक घडी कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात होती. सरत्या वर्षात ही तूट २.९ टक्क्यांपर्यंत होती. यावेळी ती २.७ टक्क्यांपर्यंत राखण्यात यश आले आहे. महसुली जमा आणि खर्च यांचा उत्तम ताळमेळ राखला गेला आहे. राज्याच्या अर्थसंकल्पाचे आकारमान आता सात लाख कोटींवर पोहचले आहे. त्यामुळे महाराष्ट्र हे आता लोकसंख्येच्या तुलनेत उत्तर प्रदेशचा अपवाद केल्यास, सर्वात मोठा अर्थसंकल्प असणारे राज्य ठरले आहे. राज्याचे उत्पन्न वाढल्याने कर्ज घेण्याची मर्यादाही वाढली आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर पत्रकार परिषदेदरम्यान एकनाथ शिंदे यांच्या मनात असलेली 'मुख्यमंत्रीपदा'ची सल पुन्हा बाहेर आली. यावेळी बोलताना 'गेल्यावेळीही आम्ही तिघे होतो. आता खुर्च्यांची थोडी अदलाबदल झाली आहे' असे म्हणत त्यांनी याचा प्रत्यय दिला. ही बाब अजित पवारांनी अचूक हेरली आणि 'तुमच्या मनातून 'ते' काही जात नाही' असा चिमटा



एकनाथ शिंदेंना काढताच एकच हशा पिकला. त्यावर शिंदेंनी तात्काळ आपले वाक्य सावरत 'अदलाबदल झाली असली तरी टीम तीच आहे', असे म्हटले.

पुढील पाच वर्षांत राज्याचा विकास डोळ्यासमोर ठेवून भांडवली गुंतवणुकीला प्राधान्य देणारा आणि रोजगार निर्मितीवर भर देणारा हा अर्थसंकल्प असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. तसेच अर्थसंकल्पात शेतकऱ्यांचे उत्पन्नवाढीस प्राधान्य देताना कोणावरही कराचा बोजा पडणार नाही, याची दक्षता घेण्यात आल्याचे पवार यांनी सांगितले.

गेल्या अडीच वर्षांपासून विकासाची घोडदौड सुरू असून महाराष्ट्र आता थांबणार नाही हा निर्धार आजच्या अर्थसंकल्पातून व्यक्त होत असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. अर्थसंकल्पात रस्ते, पूल, बंदरे अशा पायाभूत सुविधांच्या विकासासाठी चांगली तरतूद केल्याचे सांगून शिंदे म्हणाले की, आजच्या अर्थसंकल्पात एकही क्षेत्र सोडलेले नाही. औद्योगिक विकासात महाराष्ट्र आघाडीवर असून तो आणखीही पुढे राहील त्याचप्रमाणे गुंतवणुकही मोठ्या प्रमाणावर येईल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

# नीरा-भीमा नदीवरील नवे बॅरेजेस व संरक्षण घाटाची मागणी पूर्णत्वास जाणार

## क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे

मुंबई : इंदापूर मतदार संघातील निरा व भिमा नदी-वर अत्याधुनिक यंत्रणा, सुसज्ज बॅरेजेसच्या धर्तीवर नवे बॅरेजेस व सुसज्ज संरक्षण घाट बांधण्याची मागणी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली. आज मंत्रालयात आयोजित बैठकीत ही मागणी केली असून ही मागणी पूर्णत्वास जाणार आहे. आज ही बैठक मुंबई मंत्रालय येथे झाली

या मागणीनंतर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेतली. नीरा व भीमा नदी-वर जास्त पाणीसाठा होणाऱ्या शक्य त्या ठिकाणी बॅरेजेस बांधणीसाठी सर्वेक्षण करण्याची सूचना केली. नदीवर आवश्यकता तपासून घाट बांधण्याबाबत सूचना देत याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. अहवाल सादर केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले.

यावेळी जलसंपदा विभागाचे अपरमुख्य सचिव दिपक कपूर, कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता अजय गुल्हाणे, अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके, दत्तात्रय घोगरे उपस्थित होते.



## संपादकीय....

### तोंडाला पाने पुसल्याची टीका

१ लाख ३६ हजार कोटींची वित्तीय तूट, सुमारे ४५ हजार कोटींची महसुली तूट, वाढत्या कर्जाचा भार यामुळे निधीची खैरात करण्यास फारसा वाव नसल्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सोमवारी मांडलेल्या २०२५-२६च्या अर्थसंकल्पावरून स्पष्ट झाले. महायुतीला पुन्हा सत्ता मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजाविणाऱ्या लाडक्या बहिणींच्या अनुदानात वाढ करण्यात आलेली नाही. शेतकरी सन्मान योजनेच्या निधीतही वाढ झालेली नसताना उत्पन्न वाढविण्यासाठी वाहनांवर करवाढ लादण्यात आली आहे. अर्थसंकल्पाचे सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांनी स्वागत केले असतानाच राज्याच्या तोंडाला पाने पुसल्याची टीका विरोधकांनी केली आहे. लाडक्या बहिणींचे अनुदान १५०० रुपयांवरून २१०० रुपये करण्याचे आश्वासन महायुतीच्या जाहीरनाम्यात देण्यात आले होते. यामुळे महिला वर्गाचे अर्थसंकल्पाकडे लक्ष होते. मात्र अर्थसंकल्पीय भाषणात अनुदानात वाढीचा उल्लेख करण्यात आला नाही. भाजपसह महायुतीच्या नेत्यांनी संपूर्ण शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन निवडणुकीपूर्वी दिले होते. महायुती सरकार सत्तेवर आल्यामुळे याबाबत निर्णयाची अपेक्षा बाळगून अनेक शेतकऱ्यांनी कर्जाचे हप्ते भरलेले नाहीत.

# औसा तालुक्यात जलजीवन मिशनची कामे रखडली; उन्हाळ्यात तालुक्यावर पाणीटंचाईचे संकट गडद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा, तालुक्यातील अनेक गावागावात सरकारची जलजिवन मिशन योजना राबवण्यात आली असुन ग्रामिन भागात पाणी टंचाई भासु नये यासाठी : जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागात शुद्ध पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या योजनांची कामे रखडल्याने औसा तालुक्यातील अनेक गावांना उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे.

औसा तालुक्यातील काही गावांमध्ये अद्याप पाइपलाईन टाकण्याची कामे पूर्ण झालेली नाहीत, तर काही ठिकाणी जलस्रोतांपर्यंत पाणी पोहोचवण्यासाठी आवश्यक पंपिंग यंत्रणा कार्यान्वित झालेली नाही. परिणामी, उन्हाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला असता सरकारकडे जलजिवन मिशन योजना पुर्णत्वास घेउन जाण्यासाठी बजट नसल्यामुळे रखडलेली कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत अस उडवाउडवीचे उत्तरे कंत्राटदाराकडुन दिली जात आहेत .ग्रामिन भागातील काही गावामध्ये विहिरी कोरड्या पडल्याने ग्रामस्थांना पहाटेपासूनच रांगेत उभे राहून पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. महिलांना लांब अंतरावरून पाणी भरण्यासाठी मोठी मेहनत करावी लागत असून, त्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर, स्थानिक प्रशासनाने तातडीने लक्ष घालून जलजीवन मिशन अंतर्गत रखडलेली कामे पूर्ण करावीत आणि गरज भासल्यास टँकरद्वारे त्वरित पाणीपुरवठा करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. तसेच, आगामी काळात ही समस्या गंभीर स्वरूप धारण करू नये यासाठी जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि उपलब्ध पाण्याच्या स्रोतांचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

सरकारची महत्वकांक्षी असलेली जलजिवन मिशन योजना कंत्राटदाराच्या ढिलाईमुळे कित्येक दिवसापासुन गावोनगावी जलजिवन मिशनची कामे प्रलंबित असुन प्रशासनाने ठोस पावले उचलुन जलजिवन मिशन कंत्राटदारांना सक्तीचे आदेश लवकरात लवकर जलजिवन मिशन योजनेतील कामे सुरु करावीत अशी ग्रामिन भागातील ग्रामस्थांची मागणी आहे.



# दहावी बोर्डाची गणित पेपर दुपारी संपला कस्टडीला रात्री उशीरा का पोहचला ? : अविनाश मडिखांबे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : सद्या अक्कलकोट तालुक्यातील दहावीचा पेपर चालू आहे. दि. ७ शुक्रवार रोजी दहावीच्या गणित दोन पेपर दुपारी दिड वाजता संपला. तर पेपर संपल्यावर दोन तासाच्या आत सुरक्षित कस्टडीला पोहचला पाहिजे असतांना रात्री उशीरा का पोहचली? याचे सखोल चौकशी करण्याचे मागणी रिपाइं तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व मुख्यकार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पूर्वी दहावी व बारावीचे पेपर चे कस्टडी गेल्या अनेक वर्षापासून श्री शहाजी हायस्कूल अक्कलकोट या ठिकाणी होता.याच वर्षी त्या ठिकाणचे कस्टडी स्थळ बदल करून पंचायत समिती अक्कलकोट येथील सभापती कार्यालयात आणण्यात आले, अनेक वर्षापासून शहाजी प्रशालेत कार्यरत असलेले कस्टडी कार्यालय बदलण्याचे कारण काय ?याचे उद्देश काय आहे? हे पण विचार संशयास्पद आहे.

शुक्रवारी सात मार्च २०२५ रोजीचा गणित पेपर नंबर २ या पेपर शुक्रवारी ११ ते दिड या वेळेत होता पेपर संपल्यानंतर दोन ते अडीच या वेळेत सर्व पेपर एकूण गोळा करण्यासाठी कस्टडी ऑफिस पंचायत समिती अक्कलकोट येथे येण्याचे अत्यंत गरजेचे होता तसं न होता पेपर कुठे जमा केले काही कळाले नाही तब्बल रात्री पावणे नऊ वाजता एका रीक्षातून पेपर उतरवत होते त्या ठिकाणी संबंधित अधिकारी सुद्धा उपस्थित नव्हते. बोर्डाचे पेपर एवढं दुर्लक्ष करणारे अधिकारी कोण आहे असे चौकशी केली असता हे काम अक्कलकोटचे प्रभारी गटशिक्षण अधिकारी श्री प्रशांत आरबाळे यांनी आहे असं कळाले पेपर संपल्यानंतर रात्री पावणे नऊ पर्यंत पेपर कुठे होते कोणी सांगण्यास तयार नाही पेपर कस्टडीत आल्यानंतर सील बंद करायचं असतो तसे न होता कुठेतरी बाहेर सील करून कस्टडीला रात्री पाहुणे नऊ वाजता खाजगी रिक्षातून पेपर आणले आणि रोजचा पेपर असाच होत आहे का हा पंचायत समितीतील सीसीटीव्ही फुटेज चेक करून बघणे अति आवश्यक आहे, याप्रकारे सरकारी कामात दुर्लक्ष करणारे विद्यार्थ्यांचे जीवाशी खेळणारे प्रभारी गटशिक्षणाधिकारी श्री प्रशांत आरबाळे यांच्या सखोल चौकशी करुन बडतर्फ करावे.

प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे त्याने प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून पदभार घेतले पासून वादग्रस्त ठरले आहे. असे निष्क्रिय व दुर्लक्ष अधिकाऱ्याला घरचा रस्ता दाखवावे असे आरपीआय आठवले गट चे अक्कलकोट तालुकाध्यक्ष श्री अविनाश मडीखांबे यांनी संबंधित शिक्षण मंत्री जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहेत.या प्रसंगी रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,युवक ता उपाध्यक्ष कृष्णा धोडमनी,दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,आंदेवाडी(ज)शाखाध्यक्ष रमेश धोडमनी सह इतर पदाधिकारी उपस्थित होते.



# महाराष्ट्र आता थांबणार नाही.., विकास आता लांबणार नाही...

(पान १ वरून...) आर्थिक सुधारणांच्या माध्यमातून, भांडवली खर्चातील वाढीद्वारे विकासचक्रास चालना देऊन राज्याच्या विकासदरात वाढ करण्याचे उद्दीष्ट साध्य करण्याचे प्रयत्न आहेत. मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था १४० बिलीयन डॉलर वरुन सन २०३० पर्यंत ३०० बिलीयन डॉलर तर सन २०४७ पर्यंत १.५ ट्रिलीयन डॉलर पर्यंत नेण्याचे उद्दीष्ट आहे. मुंबई महानगर प्रदेशात हाती घेण्यात आलेल्या विविध पायाभूत सुविधांची कामे जसे की वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, बुलेट ट्रेन, मल्टीमोडल कॉरीडॉर, भुयारी मार्ग, मेट्रो प्रकल्प यामुळे हे क्षेत्र विकासाचे केंद्र ठरणार आहे.

विकसित भारत- विकसित महाराष्ट्र ही संकल्पना साध्य करण्याकरीता मेक इन महाराष्ट्र व्दारे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्राचे नवीन औद्योगीक धोरण आखण्यात येणार आहे. पुढील पाच वर्षाच्या कालावधीत ४० लाख कोटी रुप यांची गुंतवणुक व ५० लाख रोजगार निर्मिती अपेक्षीत आहे.

कृषी क्षेत्राच्या गेल्या वर्षीच्या निराशाजनक ३.३% विकास दराच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना विविध योजना, कार्यक्रमांच्या माध्यमातुन आर्थिक सहाय्य दिल्यामुळे सन २०२४-२५ मध्ये कृषी क्षेत्राचा विकास दर ८.७% पर्यंत सुधारला. या विकास दरात सातत्याने वाढ करण्याकरीता शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेती उत्पादनात मूल्यवर्धन, सिचंन सुविधा, वीजेची गरज भागविण्यासाठी सौर ऊर्जा इत्यादी पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येतील.

केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून राज्यास अधिकाअधिक केंद्रीय निधी प्राप्त व्हावा म्हणून विशेष प्रयत्न करण्यात येतील.

वस्तु व सेवा करातुन राज्यास होणाऱ्या उत्पन्नात दरवर्षी सुमारे १२ ते १४ टक्के एवढी वाढ होत आहे.

महत्वाकांक्षी योजनांना निधीचा सुरळीत पुरवठा होण्याकरीता केंद्रीय सहाय्य, आतंरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून सहाय्य , सार्वजनिक मालमत्तेचे मुद्रीकरण, योजनांचे सुसूत्रीकरण तसेच पायाभूत सुविधा गुंतवणूक न्यास सारखे नाविण्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.

राज्यातील महामार्ग, बंदरे, विमानतळे, जलमार्ग, बस वाहतूक, रेल्वे आणि मेट्रो या सर्व दळणवळण क्षेत्रांसाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे.

दर्जेदार ग्रामीण रस्ते तसेच राज्य महामार्ग व जिल्हा रस्त्यांना सर्वाधिक आर्थिक पाठबळ देण्यात येत आहे.

सर्वांसाठी घरे हे उद्दीष्ट येत्या ५ वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. ग्रामीण घरकुलांसाठी १५ हजार कोटी तर शहरी आवास योजनांसाठी ८ हजार १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

नव्याने जाहीर केलेल्या योजनांसाठी पुरेशा तरतुदी केलेल्या आहेत. राज्याच्या वार्षिक योजनेत ६२ हजार ५६० कोटीची म्हणजेच सुमारे ३३ टक्के इतकी भरीव वाढ करण्यात आली असून अनुसूचीत जाती घटक योजनेच्या तरतुदीत ४२ टक्के, आदिवासी घटक योजनेच्या तरतुदीत ४० टक्के वाढ करण्यात आली आहे.

राज्यात सध्या राबविण्यात येत असलेल्या योजनांचे मुल्यमापन करुन त्यांचे सुसूत्रीकरण तसेच साधनसंपत्तीच्या स्त्रोतांचा अभ्यास करुन त्यामध्ये वाढ करण्याचे उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशी विचारात घेऊन योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत.

थेट लाभार्थी हस्तांतरण (डीबीटी) सर्व वैयक्तिक लाभार्थी योजनांची अंमलबजावणी गतिमान, कार्यक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी डीबीटी पध्दत राबविण्यात येत आहे. दिनांक १ एप्रिल २०२५ पासून अशा वैयक्तिक लाभार्थी योजनांचा लाभ केवळ डीबीटी द्वारे देण्यात येईल.

राज्याच्या सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पाठबळ देण्यात येत आहे अर्थसंकल्पात विविध स्मारके, तीर्थक्षेत्र विकास, पर्यटनस्थळ विकसित करण्याच्या विविध प्रकल्पांना भरीव तरतुद करण्यात आली आहे.

राज्यातील जलपर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत.

क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आणि खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी धोरणे आणि अर्थसंकल्पीय तरतुदी करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच सार्वजनिक वितरण प्रणालीत स्मार्ट पीडीएस आणि ब्लॉक चेन तंत्रज्ञानाद्वारे अधिक पारदर्शकता आणण्यात येणार आहे.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या पार्श्वभूमीवर सहकार क्षेत्रातील महाराष्ट्राचे नेतृत्व अधोरेखित करण्यासाठी विविध महोत्सव व कार्यक्रम आयोजित करण्यात येतील.

राज्याचे सार्वजनिक आरोग्य धोरण आखण्यात येवून प्रत्येक व्यक्तीला ५ किलोमीटरच्या परिघात दर्जेदार प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावी अमंलबजावणी करण्यात येणार असून मुलींचा व्यावसायीक शिक्षणात सहभाग वाढविण्या करीता शिक्षण व परिक्षा शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे.

कायदेशीर खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी राज्यातील न्यायालयांच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे.

# माढा पंढरपूर व सोलापूरसाठी अत्यंत निराशाजनक अर्थसंकल्प : आमदार अभिजीत आबा पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : अर्थसंकल्पावर पुरोगामी विचारसरणीची छाप दिसते, पण माढा, पंढरपूर व सोलापूरसाठी काय? सोलापूर जिल्ह्यासाठी एकाही मोठ्या प्रकल्पाची घोषणा नाही - ना पर्यटन, ना उद्योग, ना जलनियोजन, ना स्मारक!

सोलापूर जिल्ह्याने महायुतीला कमी मतदान केले असले तरीही येथील जनता महाराष्ट्राचीच जनता आहे. पहिल्याच अर्थसंकल्पात हा दुजाभाव दिसेल, अशी अपेक्षा नव्हती!

राजकारण हे फक्त निवडणुकीपुरते असते, सरकार चालवताना संपूर्ण राज्याचा विचार व्हावा लागतो. मा.अजितदादा पवार असा पक्षपात करणार नाही, अशी अपेक्षा होती. पण युतीचा प्रभाव त्यांच्या अर्थसंकल्पीय मांडणीतही दिसून आला का, असा प्रश्न पडतो.

युतीने विकासापासून अशी वंचित ठेवलेली जनता पुढच्या वेळी मतदान करेल, की प्रक्षोभ वाढेल? हे वेळच ठरवेल!

याशिवाय महाराष्ट्राच्या दृष्टीने देखील हा एक फसवणुकीचा आणि दिशाभुलीचा अर्थसंकल्प आहे.

शेतकरी कर्जमाफी विषयीची फसवणूक!

शेतकऱ्यांना मोठ्या आशा दाखवल्या पण प्रत्यक्षात कर्जमाफी मिळालेली नाही.

लाडक्या बहिणींची फसवणूक!

लाडक्या बहिणींना २१०० देण्याचे आश्वासन निवडणुकीत दिले. प्रत्यक्षात मात्र काहीच नाही..

महत्त्वाचे प्रकल्प ठप्प!

सोलापूर विमानतळ, पंढरपूर विठ्ठल मंदिर समिती । सीना-माढा उपसा सिंचन प्रकल्प । ग्रामीण भागातील रस्ते, डीपी आणि वीजपुरवठा यासंदर्भात तकलादू धोरण

इतिहास घडवणाऱ्या महापुरुषांच्या स्मारकांसाठी निधी नाही!

अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासाठी कोणतीही तरतूद नाही. आधी नुसतेच भूमिपूजन करून ठेवले.

अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी निधीची तरतूद नाही!

त्यांचे ३०० व्या जयंती वर्षानिमित्त स्मारकाची घोषणा होईल असे अपेक्षित होते. पण त्या मागणीकडेही दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

फक्त जुन्या रस्त्यांचे डागडुजी, नवीन रस्त्यांना निधी नाही! हे अत्यंत खेदजनक आहे. लोकप्रिय योजनांच्या घोषणांमुळे निवडणुकीत आश्वासने देता येत असली तरी पायाभूत सुविधांसाठी त्यामुळे निधी शिल्लक राहिला नाही असे चित्र आहे.

राज्य सरकारने सादर केलेला ₹४८,००० कोटींच्या तुटीचा अर्थसंकल्प आहे. सरकारकडे नवीन विकास प्रकल्पांसाठी निधी नाही, आणि इलेक्शनच्या आधीच तिजोरी रिकामी केली आहे!

नियोजना अभावी हे सरकार पुढील पाच वर्षांत कोणतेही महत्त्वाचे कार्य करू शकत नाही, हेच या अर्थसंकल्पातून स्पष्ट होताना दिसत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अंगणवाडी सेविकांचा सन्मान राज्यासाठी प्रेरणादायी : डॉ. विश्वास आरोटे

## राज्य पत्रकार संघटनेच्या कोपरगाव तालुक्याच्या वतीने अंगणवाडी सेविकाचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोपरगाव : कोपरगाव येथील अंगणवाडी सेविकांचा सन्मान राज्यासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशसरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे यांनी केले आहे.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील सर्व अंगणवाडी सेविकांचा सन्मान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने नुकताच पंचायत समिती कार्यालय, कोपरगाव येथे करण्यात आला यावेळी ते बोलत होते .

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संजीवनी इंग्लिश मिडीयम स्कूलच्या मॅनेजिंग ट्रस्टी रेणूका कोल्हे, निवासी नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते, पोलिस उपनिरीक्षक वैशाली मुकणे,

**राज्य पत्रकार संघाच्या कोपरगाव शाखेच्या वतीने महिला दिनी अंगणवाडी सेविकांचा केलेला सन्मान सोहळा हा नक्कीच राज्यासाठी रोल मॉडेल ठरणार असून भविष्यात संघटनेच्या वतीने सर्वच तालुक्यातील अंगणवाडी सेविकाचा भव्य दिव्य सन्मान सोहळा करण्यात येईल.**

**– डॉ विश्वास आरोटे**
**प्रदेश सरचिटणीस राज्य पत्रकार संघ**

पशुधन अधिकारी डॉ. श्रद्धा काटे, महिला व बाल विकास अधिकारी रुपाली धुमाळ , भागवताचार्य कावितातार्इ साबळे ,संघटनेचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ काळे आदी उपस्थित होते .

डॉ आरोटे पुढे बोलताना म्हणाले की, पत्रकाराकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन हा वेगळा असतो परंतु पत्रकार हा एक समाजसेवकच आहे .गेली वीस- पंचवीस वर्षे पत्रकार क्षेत्रात काम करीत असताना अनेक सामाजिक उपक्रम आम्ही घेतले आहेत. अंगणवाडी सेविकांचा सन्मान करणे महत्त्वाचा उपक्रम असून आमच्यासाठी तो एक आदर्श आहे. ज्यांच्यावर अन्याय होतो त्यांना पत्रकार आठवत असतो. आमचे पत्रकार ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के पत्रकारिता करतात. अंगणवाडी सेविका व मदतनीसंचा सन्मान हे आमचे भाग्य आहे. कोपरगावच्या पत्रकार संघाच्या वतीने सेवकांचा सन्मान हा राज्यासाठीच नाही तर देशासाठी एक आदर्श ठरेल असे सांगत पत्रकार संघटनेच्या तालुका पदाधिकाऱ्याचे कौतुक केले.

संजीवनी इंग्लिश मिडीयम स्कूलच्या मॅनेजिंग ट्रस्टी रेणुका कोल्हे यांनी बोलताना सांगितले की, प्रत्येक महिला रोज आपल्या अस्तित्वाची लढाई लढत असतात. या समाजात महिला म्हणून राहणी सोपे नाही .समाजात आपल्याला टिकून राहायचे आहे. घरदार सांभाळून स्वतःची ओळख निर्माण करायची आहे. पत्रकारांमध्ये फार मोठी शक्ती आहे म्हणून दिवसेंदिवस वाढत चाललेल्या महिलांवरील अत्याचारांच्या विरोधात कडक कायदे करण्यासाठी शासनाला पत्रकारांनी भाग पाडावे असे आवाहन केले.



भागवताचार्य कविता साबळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आपणच आपल्या घराच्या गृहमंत्री ,अर्थमंत्री, दूरसंचारमंत्री ,पालकमंत्री आहोत. आपणच आपले कुटुंब सांभाळलं पाहिजे. सावित्रीबाई फुले यांनी आपल्याला स्वातंत्र्य दिले परंतु त्याचा स्वैराचार करता कामा नये. कायदा महिलांच्या बाजूने आहे त्याचा दुरुपयोग होता कामा नये. नाती जोडणे नाती जोपासणे नाती बांधून ठेवणे हे आपल्या महिलांचेच काम आहे. अन्याय अत्याचार विरुद्ध आपण स्वतः लढायला शिकलं पाहिजे असे आवाहन केले तर निवासी नायब तहसीलदार सातपुते, पोलीस उपनिरीक्षक मुकणे, पशुधन अधिकारी डॉ काटे यांनी देखील वेगवेगळे दाखले देत महिलांच्या शौर्याचे कौतुक करत सर्वांना शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष जनार्दन जगताप यांनी तर सूत्रसंचालन संघटनेचे सचिव प्रा विजय कापसे व अंगणवाडी पर्यवेक्षिका उमा खोल यांनी केले .उपस्थित मान्यवरांचे व पत्रकार संघटनेचे आभार महिला व बाल विकास अधिकारी रुपाली धुमाळ यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीते साठी तालुकाध्यक्ष जनार्दन जगताप, उपाध्यक्ष राजेंद्र जाधव, कार्याध्यक्ष किरण ठाकरे, सचिव विजय कापसे, शहराध्यक्ष हफिज शेख, उपशराध्यक्ष स्वप्नील कोपरे, कार्याध्यक्ष बिपीन गायकवाड यासह फकिरराव टेके, किसन पवार, विनोद जवरे, सोमनाथ डफाळ, संजय लाड, रवी वाघडकर, गोविंद वाकचौरे, अक्षय काळे,राहुल कोळगे आदी संघटनेच्या पदाधिकाऱ्यासह अंगणवाडी पर्यवेक्षिका यांनी अथक परिश्रम घेतले.

# समीक्षा फाऊंडेशनच्या वतीने आंबेडकरवादी संमेलन संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिवने : शिवने येथे आंबेडकरवादी कवी संमेलन पार पडले. ज्येष्ठ साहित्यिक व कवी म.भा. चव्हाण यांच्या हस्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व स्मृतीशेष इंदुबाई तुकाराम गायकवाड यांचे प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आंबेडकरवादी संमेलनाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी भंते नाग घोष यांनी त्रिसरण पंचशील ग्रहण केले. बौद्धाचार्य निलेश गायकवाड यांनी बौद्ध विधी पार पाडला. पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वितरण मान्यवरांच्या हस्ते झाले.

आज महिला दिनाचे महत्त्व विशद करून महिलांनी डॉक्टर बाबासाहेबांचे अनंत उपकार विसरू नये. यासाठी त्यांच्या परिवर्तनवादी विचारांचा ध्यास घ्यावा. माणसाला माणूस म्हणून जगायचे असेल, सन्मान हवा असेल, स्वातंत्र्य व समानता हवे असेल, तर आंबेडकरी विचारांची जागर होण्याची नितांत गरज आहे.ज्ञ बाबासाहेबांचे विचार जेवढे लवकर व्यक्ती व समाज मनात रुजतील तेव्हाच खरे समाज विकासाचे व प्रगतीचे वारे पोहोचेल. हे जेवढ्या लवकर करू तेवढे आपण अंधारातून उजेडाकडे जाण्याची प्रेरणा मिळेल. डॉक्टर बाबासाहेबांचे विचार डोक्यात घेऊन ते मेंदूत क्रांती पेरणारे होकायंत्र व्हावे. यासाठी परिवर्तनाचा ध्यास घ्यावा लागेल. डॉक्टर डी टी गायकवाड यांच्या समीक्षा फौंडेशनच्या वतीने भरविण्यात आलेले आंबेडकरवादी कवी संमेलनाचा उपक्रम स्तुत्य आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व कवी चव्हाण यांनी केले.

यात्प्रसंगी हर्षानंद सोनवणे; मोहन दुसाने; डॉ रवी नंदन होवाळ; प्रिया विठ्ठल मोरे, सुनील गायकवाड यांनी परिवर्तनवादी कविता सादर केल्या तसेच पहिली ते बारावीपर्यंतच्या सुमारे २६ विद्यार्थ्यांना शालू उपयोगी साहित्याचे वाटप झाले. अध्यक्षीय भाषण डॉक्टर किशोर पाटील यांचे झाले तर सूत्रसंचालन हर्षानंद सोनवणे यांनी केले आभार समीक्षा फाउंडेशनचे प्रमुख डॉक्टर डी टी गायकवाड यांनी मानले.

# तुळजापूर तालुकातील वागदरी येथे जागतिक महिला दिन विविध उपक्रमाने उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथे जागतिक महिला दिन विविध उपक्रमाणे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



ग्राम पंचायत वागदरीच्या वतीने येथिल जि.प. प्राथमिक शाळेत जागतीक महिल दिना निमित्ताने कार्मक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यामान सरपंच सौ.तेजाबाई शिवाजी मिटकर ह्या होत्या व प्रमुख पाहणे म्हनूण उपसरपंच सुरेखा भालचंद्र यादव,जेष्ठ कार्यकर्ते शिवाजी मिटकर गुरुजी, माजी उपसरपंच मिनाक्षी महादेव बिराजदार,तर प्रमुख अथिती म्हणून महाराष्ट्र राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाचे सन्माननिय सदस्य उमाकांत मिटकर आदी उपस्थित होते.

प्रारंभी राजमाता जिजाऊ व क्रांती ज्योती सावित्रीमाई फूले यांच्या प्रतिमांचे उपस्थित मान्यवरांचा हस्ते पूजन करून आभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी येथील अंगणवाडीचा विभागात प्रथम क्रमांक आल्याने अंगणवाडी कार्यकर्ती पद्मीनबाई पवार व मदतनिस रुपाली जाधव यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.तसेच येथील विधवा वृद्ध महिलाना ग्रा. प. च्या वतीने मायेचे चादर व खाऊचे वाटप करण्यात आले.तर उपस्थित सर्व महिलांचा सत्कार करण्यात आला.या प्रसंगी उमाकांत मिटकर यांच्या पुढाकारातून

ह.भ.प. सुधाकर इंगळे महाराज मित्र परिवारांच्या सौजन्याने शाळेतील विद्यार्थ्याना मध्यान भोजनासाठी ताट वाटी चे वाटप करव्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन सहशिक्षक तानाती लोहार यानी केले तर अभार प्रदर्शन शाळेच्या मुख्याध्यापिक महादेवी जत्ते यानी केले.

या वेळी उमेदच्या सिआरपी विद्या बिराजदार,शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा कोमल झेंडारे,अशा कार्यकर्ती पार्वती बिराजदार, सामाजिक कार्यकर्त्या भारतबाई यादव,सुंदरबाई सोमवंशी, रंजना सुरवसे जेष्ठ कार्यकर्ते भालचंद्र यादव,भाजपा मेडीया सेलचे तालूका अध्यक्ष किशोर धुमाळ, रिपाइं (आठवले) चे एस.के. गायकवाड,भाजपाचे तालूका उपाध्यक किशोर सुरवसे,माजी उपसरपंच दत्ता सुखसे,रामसिंग परिहार,बाळू पवार,बालाजी बिराजदार,दत्ता पाटील,सह कार्यकर्त,महिला ग्रामस्थ उपस्थित होते.

# सामाजिक धार्मिक राजकीय व शैक्षणिक कार्यात महिलांचे योगदान अग्रेसर

## बावीस महिलांना आदर्श नारी जिवन गौरव पुरस्कार प्रदान




नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : महिला हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी हक्काचं संरक्षण व त्यांचे सशक्तीकरण आणि समाजातील सामाजिक धार्मिक राजकीय व शैक्षणिक कार्यात महिलाचे योगदान महत्वाचे आहे.

महिलाचा समाजात आदर केला जातो ज्यांनी समाजात एक वेगळीच आळख निर्माण केली महिला विकासा साठी अनेक योजना राबविल्या जातात या योजने अंतर्गत काही महिला वंचित आहेत प्रत्येक योजनेची माहिती व्हावी महिलाना समान संधी मिळायला हवी प्रत्येक महिलांची मान उंचावली हवी महिलाला सन्मान मिळायला हवा प्रत्येक घरात मा जिजाऊ व सावित्रीमाई तयार झाल्या पाहिजेत आपण जागतिक महिला दिन साजरा करतोय महिलांचा आदर व सन्मान करण्याचा संदेश देतोय म्हणूनच महिला सशक्त झाली तरच समाज सशक्त होईल यात शंका नाही आणि हे आपण प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे आहे आसे प्रतिपादन ज्येष्ठ समाजवादी नेते तथा विचारवंत पन्नालाल भाऊ सुराणा यानी केले .

**संत तुकाराम सामाजिक संस्थेचा अनोखा उपक्रम**

नुकताच आपल घर नळदुर्ग येथे संत तुकाराम सामाजिक संस्था बाभळगांव यांच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा आदर्श नारी जिवन गौरव पुरस्काराने २२ महिलांना सन्मानित करण्यात आले यावेळेस अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

प्रथमता क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन करण्यात आले.

अणदूर येथील स्वरलता सरिता ढेपे, सचिन ढेपे, रेखा सोनटक्के , चंद्रकांत गुड्डु, यानी खूप चांगल्या पद्धतीन सदाबाहर गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली . कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थचे अध्यक्ष दयानंद काळुंके यांनी केले . तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी किशोर गोरे , विजयकुमार माने अध्यक्ष बालकल्याण समिती धाराशिव एक आदर्श उद्योजिका अंबिका गावडे, बालकल्याण समिती सदस्या ॲड. मैना भोसले, ॲड सुजाता माळी, ॲड दिपाली जाहागीरदार, वैशाली धावणे, बालकल्याण मंडळाचे सदस्य डॉ अश्रुबा कदम, हे होते. प्रत्येकानी आपआपली मनोगत व्यक्त केले विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना संत तुकाराम सामाजिक संस्था बाभळगाव यांच्या वतीने अंतरराष्ट्रीय महिला दिनानिमीत गुण गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता . यावेळी अनिता विक्रम गायकवाड, अनिता आत्माराम पवार, श्रीमती आशा भिसे, साक्षी अरविंद बनसोडे, अरुणा विश्वनाथ कानडे, सविता प्रकाश अवचार, संगीता संजय सावळकर, उमादेवी सातलिंग स्वामी, स्मिता ज्ञानेश्वर फडणीस मैना मुरलीधर भोसले ड सुजाता लक्ष्मण माळी, ॲड दिपाली शिवाजीराव जहागीरदार ॲड वैशाली धावणे, राहू संजय पाटील / भोसले, बेबी सरोजा विजयकुमार माने, अंबिका मल्लिनाथ गावडे , रेखा सिद्धू सोनटक्के, सरिता सचिन ढेपे आशाबाई प्रदीप पाटील , जय श्री भगवान कांबळे, सुलक्षणा प्रवीण आनंदगावकर, शैला दिगंबर मोळगडे, या महिलांना आदर्श नारी गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ संतोष पवार यांनी केले तर आभार अणदूर गावचे माजी सरपंच प्रबोध कांबळे यांनी केले

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रबोध कांबळे, अनिता कांळुके, अनुसया कांबळे, संगीता क्षिरसागर, पत्रकार सचिन तोग्गी, संजय आलुरे, एस के गायकवाड, माणिक निर्मळे, तिरगुळे, दादासाहेब बनसोडे प्रदीप पाटील यांनी परिश्रम घेतले.

### आदर्श विद्यालय, पंढरपूर येथील डॉ. मैत्रेयी केसकर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन

### ॲक्सलरेट द ॲक्शन या विषयावर आयोजन

# जागतिक महिला दिनानिमित्त क. भा. पा. महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळा संपन्न





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून Accelerate the Action या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. रुसा कंपोनंट आठ अंतर्गत महिला सक्षमीकरण कक्ष आणि लैंगिक छळ प्रतिबंधक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.

या कार्यशाळेचे उद्घाटन आदर्श विद्यालय, पंढरपूर येथील डॉ. मैत्रेयी केसकर यांच्या हस्ते करण्यात आले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनन्या क्रिएशन, पुणे येथील सौ. अश्विनी डोंबे होत्या.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. मैत्रेयी केसकर म्हणाल्या की, महिलांच्या सुंदरतेपेक्षा त्यांचे अस्तित्व महत्त्वाचे आहे. महिलांनी न्यूनगंडावर मात करून स्वतःच्या कलागुणांना वाव द्यावा आणि सर्व क्षेत्रांत पुढे यावे. तसेच जिजाऊ, अहिल्याबाई होळकर आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा उल्लेख करत महिलांनी त्यांचा आदर्श घेऊन स्वतःच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करावा, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात सौ. अश्विनी डोंबे यांनी महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचे महत्त्व स्पष्ट केले. आर्थिक स्वायत्तता लाभलेल्या महिला स्वतःचा मानसिक, सामाजिक आणि शारीरिक विकास अधिक प्रभावीपणे करू शकतात. त्यामुळे महिलांनी उद्योग, व्यापार आणि व्यावसायिक क्षेत्रांत सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयातील महिला प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व सफाई कामगार महिलांचा डायरी, पेन आणि गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. तसेच महिलांसाठी ज्वेलरी मेकिंग वर्कशॉप आयोजित करण्यात आले, ज्यामध्ये मोत्याची नथ बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नेहा देसाई यांनी केले, तर उपस्थितांचे स्वागत आणि पाहुण्यांचा परिचय ग्रंथपाल डॉ. विनया पाटील यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे आणि डॉ. भारती सुडके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महिला सक्षमीकरण कक्ष व लैंगिक छळ प्रतिबंधक समितीने विशेष परिश्रम घेतले. शेवटी आभार प्रदर्शन डॉ. शिल्पा पवार यांनी केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील महिला प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थीनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# वागदरी येथे शांभवी कल्याणशेट्टी यांच्या हस्ते जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना सन्मान पत्र देऊन गौरव

## सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंचचे सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी ) जागतिक महिला दिनानिमित्त वागदरी येथे सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंचच्या वतीने एकवीस कर्तबगार महिलांना स्त्री रत्न पुरस्कार देऊन कार्यक्रमाचे अध्यक्ष शांभवी सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आले.

प्रतिमा पूजन बसवराज शेळके, श्रीशैल ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आले दीप प्रज्व-लन वागदरीचे सरपंच शिवानंद घोळसगाव उपसरपंच पंकज सुतार भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख उपस्थिती सागर दादा कल्याणशेट्टी उपसरपंच हन्नूर, आयोजक शाम बाबर, कमलाकर सोनकांबळे उपसरपंच, सौ. सुरेखा होळीकट्टी (मा. तालुकाअध्यक्ष भाजपा महिला), डॉ. सुवर्णा पाटील (आळंद), सौ. चंद्रकला कारीमुंगी (करजगी), डॉ. शिव-लीलाताई पाटील (कडबगांव), सौ. वनिता मधुकर सुरवसे (सरपंच गोगांव), सौ. विद्याताई स्वामी (सरपंच, बोरगांव), सौ. आशाताई आप्पासाहेब बिराजदार (सरपंच शिरवळ), सौ. मुक्ताबाई शिवानंद पटणे (सरपंच, सद-लापूर), सौ. सुनंदा सिध्देश्वर मठपती (सरपंच, खैराट), सौ. स्नेहा राजकुमार शहाणे (हन-ुरे) (सरपंच शिरवळवाडी), सौ. मलम्मा रामचंद्र रायगुडे (सरपंच, भुरीकवठे), सौ. श्रृती अरविंद भांगे (प्र. सरपंच किरनळ्ळी), लक्ष्मीबाई पोमाजी,शारदा रोटे, शिवानंद गोगांव, प्रदिप पाटील, लक्ष्मण सलगरे, शिवाजी सावंत , डॉ. शिवराज संगशेट्टी, चंद्रकांत मातोळे, नागप्पा आष्टगी, श्री. शिवशरण यमाजी उपस्थित होते.

मनोगत व्यक्त करताना भाजपा तालुकाध्यक्ष सुरेखा होळीकट्टी म्हणाले की महिला घरात न बसता त्यांनी सामाजिक कार्यात सहभागी झाले पाहिले महिला सक्षम झाले पाहिजे, आज प्रत्येक ठिकाणी महिला प्रगती पथावर आहे, निर्भयपणे सामाजिक क्षेत्रात पुढे आले पाहिजे, आपल्या मुलींना शिक्षण देऊन त्याच्या आवडत्या क्षेत्रात करियर करण्यासाठी संधी द्यावे सध्या शासनाचे महिला व मुलीसाठी विविध योजना राबविण्यात येत असून त्याची फायदा घेण्यात यावे सदर कार्यक्रम एक आगळा वेगळ्या पद्धतीने केल्यामुळे संयोजक शाम बाबर, कमलाकर सोनकांबळे महादेव सोनकवडे यांची सर्व स्तरातून कौतुक केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बसवराज पाटील, राजकुमार मंगाणे, सुनिल सावंत, मकबुल कणमुसे, सतिश कणमुसे, प्रकाश पोमाजी, संतोष पोमाजी, विरभद्र मंगाणे, विरभद्र पुरंत, पिंटु मातोळे, परमेश्वर मुंजाळे, करण आळगे, रमेश मंगाणे, रवि पोमाजी, किरण गायकवाड, असलम मुल्ला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाद-ेव सोनकवडे यांनी तर आभार प्रदर्शन राजश्री शेळके मॅडम यांनी केले.

### महिला स्त्री रत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आलेल्या भगिनी खालील प्रमाणे

साधना पाटील (वैदयकीय), जयश्री बटगेरी (सामाजिक), ज्योती गाजरे जाधव (निर्भय पथक), सना मियाँवाले (निर्भय पथक), राजेश्री शेळके (उपक्रमशिल शिक्षिका), रेखा सोनकवडे (उपक्रमशिल मुख्यध्यापिका), अनुसया कलशेट्टी (आदर्श शिक्षिका), मनिषा कुन्हाळे (आदर्श शिक्षिका), जयश्री मुनोळी (आदर्श शिक्षिका), अर्चना गिरी (आदर्श शिक्षिका), कविता फड (आदर्श शिक्षिका), आशा वाकडे (आरोग्य), शिरीन खडकाळे (आदर्श मुख्यध्यापिका), शैलजा पोमाजी (उपक्रमशिल शिक्षिका), महानंदा पोमाजी (उपक्रमशिल शिक्षिका), प्रभावती ठोंबरे (उत्कृष्ठ संगणक परिचालिका), ज्योती सावंत (आदर्श शिक्षिका), प्रगती नरुणे (बँक सखी), ललीता भटारे (पोलिस मित्र), रत्नाबाई कंचे ( शिक्षिका ) शहनाजबानु मोहम्मद फारूख सुंडके (उत्कृष्ठ मुख्यध्यापिका). वागदरी येथील आरोग्य सेविका, शिक्षिका, आशाताई, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे फेटा बाधुंन सन्मानपत्र देऊन गौरव व २०१ महीलांना फेटा बांधुन सन्मान करण्यात आले.






















